# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र. ६२-२२ दिनांक २४/०२/२०२२

## अल्पवयीन मित्राचा खून करुन पळून जाणा-या विधीसंघर्षीत बालकास १२ तासांच्या आत ताब्यात घेऊन खुनाच्या गुन्हयाची उकल.

वालीव पोलीस ठाण्याच्या कार्यकक्षेत बावशेतपाडा येथे दिनांक २२.०२.२०२२ रात्रौ ०७:३० वाजताच्या सुमारास अल्पवयीन मुलगा याच्या पोटात चाकु मारुन त्याचा खुन केलेबाबत वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २१०/२०२२ भादंविस कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठ अधिका-यांनी वालीव ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांना तपासाच्या सुचना केल्या. सदर गंभीर गुन्हयाची उकल करण्याकरिता वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त करुन मयताच्या अल्पवयीन मित्रास ( विधीसंघर्शीत बालक ) विनाविलंब ताब्यात घेवून त्यास विचारपूस केली असता स्पीकर वाजण्याच्या कारणावरुन त्यानेच अल्पवयीन मित्राचा खुन केल्याची कबुली दिली.

विधीसंघर्षीत बालकाकडे केलेल्या चौकशीत निष्पन्न झाले की, स्पीकर वाजत नसल्याचे कारणावरुन खुनाच्या दिवशी दुपारी ०२:०० वाजता झालेल्या भांडणाचा मनात राग धरुन त्याचा मित्र करण रविंद्र गुप्ता यास रागाच्या भरात पोटात चाकु मारुन त्याचा खुन केला व त्यानंतर खुन करुन पळुन जाऊन त्याने स्वत:ची कायदेशिर अटक टाळण्यासाठी पळुन जाण्याच्या तयारीत असतांना त्यास वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी ताब्यात घेतले आहे.

वरील कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (प्रशासन) मिलिंद सांबळे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना. सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.अंम. सूर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी केली आहे.